RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक १३८(५)] मंगळवार, ऑक्टोबर १०, २०१७/आश्विन १८, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक ३३२

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १० ऑक्टोबर २०१७.

**अधिसूचना**

**ऊस नियंत्रण आदेश, १९६६.**

क्रमांक ससाका २०१७/प्र.क्र.२७०/ २५-स.—ज्याअर्थी, ऊस गाळप हंगाम २०१७-१८ हा दिनांक १ नोव्हेंबर २०१७ पासून सुरू करण्याचा निर्णय मंत्री समितीने घेतला आहे ;

आणि ज्याअर्थी, ऊस गाळप हंगाम २०१७-१८ मध्ये राज्यात ऊसाचे उत्पादन व साखर उत्पादन कमी होणार असल्याचे साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनाच्या निदर्शनास आणले आहे ;

आणि ज्याअर्थी, गाळप हंगाम २०१७-१८ मध्ये साखर उद्योग पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी परराज्यात ऊस निर्यातीवर बंधन घालणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, आता, ऊस नियंत्रण आदेश, १९६६ चे खंड ६ च्या उप खंड १ मधील परिच्छेद (एफ) तसेच सदर आदेशाच्या खंड ११ मधील उप खंड १ (ब) मधील तरतुदीनुसार केंद्र शासनाच्या अन्न, कृषि, सामाजिक विकास व सहकार विभागाच्या (अन्न विभाग) अधिसूचना क्रमांक जीएसआर-११२७/ईएसएस.सीओएम/शुगर केन, दिनांक १६ जुलै १९६६ अन्वये प्राप्त या संबंधित असलेल्या इतर सर्व आनुषंगिक अधिकारानुसार महाराष्ट्र शासन वैयक्तिक (स्वायत्त संस्था यासह) यांचा ऊस दिनांक ३० एप्रिल २०१८ पर्यंत परराज्यात निर्यात करण्यास प्रतिबंध करीत आहे. यासंदर्भात परवानगी देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय राज्याबाहेर ऊस निर्यात करता येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दि. शि. देसाई,**
शासनाचे उप सचिव.

## CO-OPERATION, MARKETING AND TEXTILES DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 10th October 2017.

*NOTIFICATION*

THE SUGARCANE (CONTROL) ORDER, 1966.

No. SSK 2017/CR-270 / 25-C.—Whereas, the Committee of Ministers has specified the 1st November 2017 to be the date of starting of Sugarcane Crushing Season 2017-2018 ;

And whereas, it has been brought to the notice of the State Government by the Commissioner of Sugar, Maharashtra State, Pune that the availability of sugarcane for production of sugar is less in the Sugarcane Crushing Season 2017-2018, in the State of Maharashtra;

And whereas, it is expedient to restrict the export of the Sugarcane outside the State of Maharashtra in order to enable the sugar industries to operate to their full capacity.

Now, therefore, in exercise of the powers conferred by paragraph (*f*) of sub-clause (*1*) of Clause 6 of the Sugarcane (Control) Order, 1966, of the Central Government, delegated to the Government of Maharashtra under sub-clause (*b*) of clause (1) of Clause 11 thereof, *vide* the Government of India Notification, Ministry of Food, Agriculture, Commodity Development and Co-operation (Department of Food), No. GSR.1127/Ess.Com/Sugarcane, dated the 16th July 1966, the Government of Maharashtra hereby restricts the export of Sugarcane to any person (including body corporate) outside the State of Maharashtra, till 30th April 2018, except with the permission issued in this behalf by the competent authority.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. S. DESAI,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.